# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या २०५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११: ०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २०५ वी तातडीची बैठक **गुरुवार, दि.०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १७) | डॉ. अजयकुमार जाधव<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्रभारी कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. सुशिल कुमार शिंदे व डॉ. अजित माधव पाटणकर यांनी आपली अनुपस्थिती ईमेलद्वारे कळविली असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १ ]</td><td>दिनांक ०६/१०/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृतांत विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दिनांक ०६/१०/२०२५ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S. ३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दिनांक ०६/१०/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृतांत विचारार्थ.</td><td>अभियांत्रिकी विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>दिनांक ०६/१०/२०२५ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृतांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>१) विषय क्र.१ मधील ठरावात “१०० फुट लांबी, रुंदी” ऐवजी “१०० फुट लांबी व रुंदी” अशी दुरुस्ती करण्यात यावी असे ठरले.<br>२) विषय क्र.२ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.
<table>
<tr><td>१.</td><td>प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा<br>प्र-कुलगुरु</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२.</td><td>डॉ. अतुल लकडे<br>प्र.कुलसचिव</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३.</td><td>प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४.</td><td>विद्यापीठ अभियंता</td><td>सदस्य-सचिव</td></tr>
</table>
३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाच्या संपूर्ण कामाकाजाची चौकशी करण्याकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.
<table>
<tr><td>१.</td><td>प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२.</td><td>श्री. सुभाष मस्के</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३.</td><td>श्री. संजय क्षीरसागर</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४.</td><td>श्री. सचिन मारुती गायकवाड</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५.</td><td>विद्यापीठ अभियंता</td><td>सदस्य-सचिव</td></tr>
</table>
वरील समितीने चौकशीचा अहवाल दि.२८/१०/२०२५ पर्यंत सादर करावा असे ठरले.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **विद्यापीठ नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी चालू असलेल्या ग्रुप हेल्थ इन्शुरन्स योजनेस दि.०३/११/२०२५ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन सदर योजना TATA AIG विमा कंपनीच्या माध्यमातून लागू करुन TATA AIG विमा कंपनीस रु.३२,६२,०७८/- (वस्तू व सेवा करासह) इतकी रक्कम प्रीमियम पोटी अदा करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५ (३७) तरतुदीच्या अधीन राहून विद्यापीठ नियमित कर्मचारी यांच्या करता ग्रुप हेल्थ इन्शुरन्स योजना विद्यापीठ व कर्मचारी यांच्या समान आर्थिक सहभागातून राबवण्यात येते. साल २०२४-२५ करता सदर योजना TATA AIG कंपनी मार्फत राबविण्यात येत असून सदर योजनेचा कालावधी दि.२/११/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यापुढील १ वर्ष कालावधी साठी सदर योजनेस मुदतवाढ देण्याची बाब प्रशासनाच्या विचारार्थ होती. वित्त व लेखा विभागाच्या अभिप्रायास अनुसरुन सदर योजनेस मुदतवाढ देण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांनी नामनिर्देशित केलेल्या समितीने TATA AIG कंपनीने वर्ष २०२४-२५ मध्ये दिलेल्या सेवेचा आढावा घेऊन TATA AIG कंपनीने दिलेली सेवा समाधानकारक असल्याचा अभिप्राय दिलेला होता. सदर अभिप्राय लक्षात घेता TATA AIG कंपनीकडून वर्ष २०२५-२६ करता ग्रुप हेल्थ इन्शुरन्स योजनेचे नूतनीकरण करण्याच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय यांची प्रशासकीय मान्यता घेऊन दरपत्रक मागविण्यात आलेले असून त्यांनी प्रीमियम पोटी रु.३२,६२,०७८/- (वस्तू व सेवा करासह) इतकी रक्कम सांगितली असून सदर रक्कम गतवर्षी दिलेल्या प्रीमियम रक्कमेपेक्षा रु.४४९७९/- इतक्या रक्कमेने अधिक आहे. सदर वाढीव प्रीमियम रक्कम ही वित्त व लेखा विभागाच्या दि.२५/०९/२०२५ च्या आरोग्य केंद्रास दिलेल्या अभिप्रायानुसार १०% पेक्षा कमी असल्याने सदर कंपनी सोबत ग्रुप मेडिक्लेम योजनेचे नूतनीकरण करता येऊ शकेल. तसेच सदर प्रीमियम ची रक्कम विद्यापीठ व कर्मचारी यांच्या समान आर्थिक सहभागातून अदा करण्यात येत असल्याने सदर योजना राबविण्यापोटी विद्यापीठावर रु.१६,३१,०३९/- इतका आर्थिक भार पडणार आहे व उर्वरित रक्कम रु.१६,३१,०३९/- चालू वर्षी ग्रुप मेडिक्लेम योजनेत सहभाग नोंदवू | आरोग्य केंद्र |

| | | |
|---|---|---|
| | इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून समान हफ्त्यात कपात करुन विद्यापीठ फंडात जमा करुन अदा करण्यात येणार आहे. विद्यापीठाने सदर योजना राबविण्यासाठी आर्थिक वर्ष २०२५-२६ करता रु.२०,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे.<br>सबब, विद्यापीठ नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी चालू असलेल्या ग्रुप हेल्थ इन्शुरन्स योजनेस दि.०३/११/२०२५ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन सदर योजना TATA AIG विमा कंपनीच्या माध्यमातून लागू करुन TATA AIG विमा कंपनीस रु.३२,६२,०७८/- (वस्तू व सेवा करासह) इतकी रक्कम प्रीमियम पोटी अदा करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **विद्यापीठ नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी चालू असलेल्या ग्रुप हेल्थ इन्शुरन्स योजनेस दि.०३/११/२०२५ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देऊन सदर योजना TATA AIG विमा कंपनीच्या माध्यमातून लागू करुन TATA AIG विमा कंपनीस ₹३२,६२,०७८/- (वस्तू व सेवा करासह) इतकी रक्कम प्रिमीयम पोटी अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा.कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३(१) ] | व्यवस्थापन परिषदेची बैठक संपन्न झाल्यानंतर विभागाकडून ३ दिवसामध्ये कार्यवृत्तांत तयार करुन कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्ती सुचवायच्या असल्यास, त्या ३ दिवसामध्ये सर्व सदस्यांकडून मागवून घेण्यात याव्यात व त्यानंतर कार्यवृत्तांत अंतिम मंजूरीसाठी मा.कुलगुरुमहोदय यांचेकडे सादर करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | व्यवस्थापन परिषदेची बैठक संपन्न झाल्यानंतर विभागाकडून ३ दिवसामध्ये कार्यवृत्तांत तयार करुन कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्ती सुचवायच्या असल्यास, त्या ३ दिवसामध्ये सर्व सदस्यांकडून मागवून घेण्यात याव्यात व त्यानंतर कार्यवृत्तांत अंतिम मंजूरीसाठी मा.कुलगुरुमहोदय यांचेकडे सादर करण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद